Impact Factor (SJIF): 6.092 E-ISSN: 2583-1615

International Journal of Research in Academic World

Received: 19/December/2024 IJRAW: 2025; 4(1):136-138 Accepted: 27/January/2025

# बुलडाणा व अकोला जिल्हयामधील फोटोग्राफी व्यवसायाचे व्यवस्थापकीय अध्ययन

*[1]श्री. सतिश शालीग्राम हागे और [2]डॉ. जयंत डी. पोरे

*[1]Research Scholar, Department of Commerce, G.S. College Khamgaon, Sant Gadge baba Amravati University Amravati, Maharashtra, India.

[2]Associate Professor, G.S. College Khamgaon, Sant Gadge baba Amravati University Amravati, Maharashtra, India.

**सारांश**

फोटोग्राफी हा सर्वांचा जिव्हाळयाचा विषय आहे। जुन्या काळामधे पेंटींगपासून आजच्या नविन तंत्रज्ञानाच्या युगामधे कॅमे-याच्या माध्यमातुन छायाचित्र टिपणे असा फोटोग्राफीचा खुप मोठा इतिहास आहे. या फोटोग्राफीच्या विविध पैलुंवर विविध देशांमधील खुप शास्त्रज्ञांनी संशोधने केली, अभ्यास केला ज्यामुळे आज फोटोग्राफी खुप जलद आणि सोपी अशी झाली। त्याचप्रमाणे सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारी झाली। सुरुवातीला जुन्या काळामधे मोठमोठे राजे महाराजे त्यांच्या स्वतःच्या पेंटींग्स त्या काळामधील चित्रकार, कलाकार यांच्याकडुन काढुन घेत असत परंतु ते काम खुप खर्चिक आणि वेळखाउ पध्दतीचे होते तासनतास वाया जायचे परंतु त्याकाळामधे दुसरा कोणताही पर्याय नव्हता परंतु आज कालांतराने या संपुर्ण प्रक्रीयेमधे खुप मोठा बदल झपाटयाने होत गेला आणि आजची आधुनिक फोटोग्राफी अस्तित्वात आली।

आज कलेला विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड मिळाली परिणामी फोटोग्राफी क्षेत्र हे रोजगाराच्या खुप मोठया संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महत्त्वाचे ठरले। प्रस्तुत शोधप्रबंधामधे फोटोग्राफी आणि फोटोग्राफरच्या ब-याच बाबींवर प्रकाश टाकलेला आहे ज्यामुळे या व्यवसायिकांच्या संधी आणि अडचणी पण समजुन येतात। बुलडाणा आणि अकोला जिल्हयामधे फोटोग्राफरची संख्या खुप मोठी आहे. बुलडाणा जिल्हयामधे एकुण 13 तालुक्यांमधे एकुण 590 फोटोग्राफी व्यवसायिक असुन अकोला जिल्हयातील 7 तालुक्यांमधे एकुण 540 फोटोग्राफी व्यवसायिक आहेत।

**मुख्य शब्द:** फोटोग्राफी, फोटोग्राफर, कॅमेरा आदि।

## प्रस्तावना

असंख्य शब्द बोलुनसुध्दा जो विषय समजत नाही तो विषय एक फोटो न बोलताच समजुन देतो एवढे मोठे सामर्थ्य एका फोटोमधे असते। फोटोग्राफी हा सर्वांनाच आपलासा वाटणारा विषय आहे. आज तर मोबाईल कॅमे-यांमुळे प्रत्येक व्यक्ती फोटोग्राफीचे ज्ञान ठेउन आहे. कारण हा फोटोग्राफी विषय खुपच गहन आणि मजेदार आहे।

यामधे इतरांना वाटते की फोटोग्राफर खुप खुश आणि सुखी आहे आणि फोटोग्राफरला वाटते की समोरचे खुप आनंदी आहेत। परंतु सत्यता ही वेगळी असु शकते, तसे फोटोग्राफी आणि फोटोग्राफर यांनी कोणत्या प्रकारचे काम पार पाडावे याबद्दल जगामधे कुठेही कठोर आणि तात्विक असे नियम नाहीत।

बुलडाणा आणि अकोला जिल्हा फोटोग्राफर हे सर्व आपापल्या कामामधे निपुण आहेत। बुलडाणा आणि अकोला जिल्हा मिळुन एकुण 1130 फोटोग्राफर आहेत। बुलडाणा आणि अकोला जिल्हयामधे फोटोग्राफीसंबंधी कोणतेही काम असेल तर त्याची पुर्तता ही जिल्हयांतर्गतच होते। या दोनही जिल्हयांमधील फोटोग्राफी व्यवसायिक हे पुर्णपणे व्यवसायिक फोटोग्राफर आहेत। त्यामुळेच या दोनही जिल्हयांमधील ग्राहकांना आपल्या फोटोग्राफीच्या गरजा पुर्ण करण्यासाठी जिल्हयाबाहेर जाण्याची गरज पडत नाही।

बुलडाणा जिल्हा हा विदर्भाचे प्रवेशव्दार म्हणुन ओळखला जातो। बुलडाणा आणि अकोला हे दोनही जिल्हे मिळुन एकंदरित फोटोग्राफी व्यवसायाच्या दृष्टीने सर्वच बाबी या जिल्हयांतर्गतच उपलब्ध आहेत। या दोनही जिल्हयांमधे फोटोग्राफी संबंधित सर्वच सामुग्री मिळते म्हणजे येथिल व्यवसायिकांना कॅमेरा संबंधित खरेदी किंवा उपकरणांच्या खरेदीसाठी मुंबई किंवा इंदोर जाण्याची गरज पडत नाही। तसेच प्रिंटींग संबंधित फोटोकॉपी प्रिंट असो किंवा मोठे अल्बम असो त्याचप्रमाणे व्हिडीयो एडीटींग संदर्भातील सर्व काम, सिनेमॅटीक व्हिडीयो एडीटींग हे सुध्दा जिल्हयांतर्गतच केले जातात। ज्यामुळे फोटोग्राफी व्यवसायिकांचा अतिरिक्त वेळ आणि पैसा या दोन्हींची बचत होते।

## संशोधनाचे उद्देश

i). फोटोग्राफी म्हणजे काय ते अभ्यासणे।
ii). फोटोग्राफीचे प्रकार अभ्यासणे।
iii). फोटोग्राफरचे प्रकार अभ्यासणे।

*Corresponding Author: श्री.सतिश शालीग्राम हागे

iv). फोटोग्राफीसाठी लागणारे साहीत्य अभ्यासणे।
v). भांडवल कशाप्रकारे उपलब्ध केले ते अभ्यासणे।
vi). फोटोग्राफी व्यवसायामधे कर्मचाऱ्यांचे नियोजन अभ्यासणे।
vii). बुलडाणा आणि अकोला जिल्हयामधील फोटोग्राफरची संख्या शोधून काढणे।
viii). बाजारपेठेची व्याप्ती अभ्यासणे।

## संशोधनाची गृहीते

i). फोटोग्राफी व्यवसायामधे उत्पन्नापेक्षा मजुरीवरील खर्च जास्त आहे।
ii). उत्पन्न आणि खर्च यांच्या संतुलनाअभावी फोटोग्राफी व्यवसाय चालत आहेत
iii). सतत होणारी नापिकी आणि मालाला मिळणारा कमी भाव याचा परिणाम होवुन फोटोग्राफरची आर्थिक परिस्थिती खालावत आहे।
iv). फोटोग्राफरला ब-याचशा सुविधांचा अभाव आहे।
v). कायदेशिर हक्क मिळण्यासाठी शासनदरबारी हया व्यवसायासाठी कोणी उभे राहत नाही।

## संशोधन पध्दती

वस्तुस्थिती जाणुन घेण्यासाठी एखादया विषयाचा सुक्ष्म रितीने समिक्षात्मक अभ्यास करणे याला संशोधनासाठी प्रमाणित केलेल्या पध्दतीला संशोधन पध्दती असे म्हणतात।

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि व्दितियक अशा दोन्ही सामुग्रींचा उपयोग करण्यात आलेला आहे। फोटोग्राफी व्यवसायामधे विविध प्रकारची साधनसामुग्री लागत असते फोटोग्राफर ला व्यवसाय करण्यासाठी कॅमेरा हा एकमेव घटक नाही तर कॅमे-याशिवाय पण खुपकाही साधनसामुग्री ही लागत असते ती साधनसामुग्री पुढीलप्रमाणे।

**तालिका 1**

| | |
|---|---|
| कॅमेरा | कॅमेरा स्ट्रिप |
| कॅमेरा लेन्सेस | आयकॅप |
| लेन्स हुड | लेन्य फिल्टर |
| ऑन कॅमेरा फ्लॅश | ऑफ कॅमेरा फ्लॅश |
| कॅमेरा ट्रिगर | लायटींग युनिट |
| कॅमेरा बॅटरी | फ्लॅश बॅटरी |
| फ्लॅश सेल | मेमरी कार्ड |
| कॅमेरा प्रोटेक्टिंग फिल्म | कॅमेरा प्रोटेक्टींग केस |
| कॅमेरा बॅग | स्टुडीयो बॅकग्राउंड |
| स्टुडीयो लाईट्स | स्टुडीयो चेयर ग्राहकांसाठी |
| स्टुडीयो चेयर मालकासाठी | संगणक संच |
| एक्स्टर्नल हार्ड डिस्क | संगणक टेबल |
| प्रॉप्स | डेमो अल्बम |
| डेमो फ्रेम्स | प्रिंटर |
| फोटोपेपर | फोटो पॉकेट |
| संगणक सॉफ्टवेयर | संगणक हार्डवेयर |
| मेमरी कार्ड रिडर | इंटरनेट कनेक्शन |
| इंटरनेट मॉडेम | पेन ड्राईव्ह |
| कनेक्टीव्हीटी केबल | विज |
| पाणी | मॉडेल स्टॅंड |
| मोनोपॉड | ट्रायपॉड |
| एल.सी | एल. ई. डी. लाईट |
| पोट्रा लाईट | लेन्स फिल्टर |
| असिस्टंट | डेमो प्रिंट्स |
| स्कॅनर | रिफ्लेक्टर |
| डिफ्युजर | चेंजिंग टेन्ट |

यावरुन असे लक्षात येते की, फोटोग्राफी हा व्यवसाय सुरु करण्यासाठी कॅमेरा हाच एकमेव घटक नाही तर खुप प्रकारच्या वस्तुंची आवश्यकता असते।

वरिल विविध साधनां व्यतिरिक्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे विज। कोणताही कॅमेरा हा फक्त बॅटरी च्या भरोशावर असतो आणि ती बॅटरी विजेमुळे चार्ज होत असते म्हणजे यावरुन समजते की या व्यवसायाला विजेची पण गरज असते। विषय संशोधन करतांना असे आढळून आले की फोटोग्राफरला आणि फोटोग्राफी व्यवसायाला क्षणोक्षणी विजेची गरज असते।

या व्यतिरिक्त फोटोग्राफी व्यवसायाला इतर पण खर्च लागू असतात जसे की, दुकान भाडे, दुकानचे विज बील, दुरुस्ती व देखभाल, अपडेशन, जाहीरात खर्च, ॲड मटेरियल, कामगारांचे वेतन, चहापान आणि नाष्ता, विमा, घराचे भाडे, घराचे विज बील ई. खर्च पण व्यवसायिकांना करावे लागतात। खर्च हे सर्वांनाच लागू असतात आणि फोटोग्राफी व्यवसायिक सुध्दा याला अपवाद नाहीत।

### फोटोग्राफीचे प्रकार

फोटोग्राफी ही संकल्पना लहान किंवा काही घटकांपुरती मर्यादीत अशी नाही तर ती अतिशय व्यापक व खुप मोठी संकल्पना आहे।

i). Nature Photography
ii). People Photography
iii). Manmade object Photography
iv). Others

फोटोग्राफी व्यवसायामधे फोटोग्राफरला सहकार्य करणा-या व्यक्ति व्यवसाय कोणताही असो, व्यवसाय करण्यासाठी हिम्मत, भांडवल, जागा, ज्ञान या गोष्टी जितक्या महत्त्वाच्या असतात तितकेच महत्त्वाचे असतात ते फोटोग्राफर ला व्यवसायात सहकार्य करणा-या व्यक्ति। यशस्वी व्यवसाय एकटा व्यक्ति करुच शकत नाही। त्याला प्रत्यक्षपणे आणि अप्रत्यक्षपणे मदत करणारे असतिल तरच व्यवसाय यशस्वी होतो।

फोटोग्राफर होण्यासाठी त्याला सगळयात आधी रस्ता दाखवणारा गुरु हाच पहिला महत्त्वाचा व्यक्ति असतो त्याच्या सहकार्याशिवाय व्यवसायाची कल्पना अस्तित्वात येत नाही। गुरु च फोटोग्राफरला व्यवसायाची दिशा दाखवतो यानंतर येते प्रशिक्षण देणारी व्यक्ति। कोणताही व्यवसाय करतांना सर्वप्रथम त्याचे प्रशिक्षण घेणे आवश्यक असते। हे प्रशिक्षण घेतल्यानंतरच व्यक्तिला आवश्यक माहिती मिळते आणि व्यक्तिला व्यवसायिक काम करता येते। व्यवसाय करतांना योग्य प्रशिक्षण घेतले तरच यामुळे वेळेची आणि श्रमाची बचत होते ज्यामुळे कमी वेळेमधे अधिक चांगले काम करता येणे शक्य होते। त्यामुळे हया प्रशिक्षण देणा-या व्यक्ति कोणत्याही व्यवसायातील महत्त्वाच्या दुवा असतात। यानंतर व्यवसाय सुरु करतांना या व्यवसायाला खुप महागडे सामान पाहीजे असते कॅमेरा, संगणक, लेन्सेस, लाईटींग युनिट हे सर्वच सामान व्यवसायिकाने स्वतः आणायचा विचार केला तर 10 लाख रुपये पण कमी पडतील एवढी मोठी गुंतवणुक करावी लागते। जी गुंतवणूक सर्वांनाच शक्य नसते त्यामुळे या व्यवसायात काही व्यवसायिक मित्र असे असतात जे कॅमेरे भाडयाने देतात। फोटोग्राफी व्यवसायिकांना कॅमेरा वापरण्याची सवय असते आणि परिपुर्ण माहीती पण असते त्यामुळे याठिकाणी फोटोग्राफी व्यवसायिकांना महागडे कॅमेरे विकत न आणता कमी गुंतवणूकीमधे पण व्यवसाय करता येतो आणि कॅमेरे भाडयाने देणा-यांची पण कमाई होते।

### निष्कर्ष

i). बुलडाणा आणि अकोला जिल्हयामधील सर्वच फोटोग्राफी व्यवसायिक ग्राहकांना सर्वच सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तत्पर असतात।
ii). बुलडाणा आणि अकोला जिल्हयामधील सर्वच फोटोग्राफी व्यवसायिक हे आपल्या व्यवसायामधे अव्वल आहेत आणि प्रत्येकाकडे आपली वेगळी कला आहे।
iii). बुलडाणा आणि अकोला जिल्हयामधील सर्वच फोटोग्राफी व्यवसायिक काही नवशिके फोटोग्राफर व्यवसायामधे निपुण नाहीत।
iv). फोटोग्राफरच्या बाबतीत ग्राहकांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे।

### उपाययोजना व शिफारशी

i). नवशिक्या फोटोग्राफरनी जुन्या व अनुभवी फोटोग्राफी व्यवसायिकांशी भेटुन आणि संघटनेसोबत राहून व्यवसायाचे नियम जाणून घेउन व्यवसाय करावा ज्यामुळे ग्राहकांकडुन फसवले जाण्याची शक्यता कमी होईल, कारण नविन व्यवसाय करणाराला व्यवसायाची पध्दती माहीती नसते, काम घेत असतांना काय बोलावे, ग्राहकांसोबत कामाचा करार कसा करावा याची माहीती नसल्यामुळे फसविले जाण्याची शक्यता अधिक असते
ii). कॅमेरा घेतला म्हणजे तो चांगला फोटोग्राफर आहे असेच गाहक समजतात परंतु हा पुर्णपणे चुकीचा समज आहे बरेचदा ग्राहक स्वस्त फोटोग्राफीच्या नादात कोणतीही माहीती न घेता किंवा फोटोग्राफी व्यवसायाचे ज्ञान नसलेल्या व्यक्तींकडे काम देतात
iii). परंतु हे चुकीचे आहे कारण व्यवसायामधे जुने किंवा अनुभवी फोटोग्राफरकडे काम केल्यास ग्राहक फसवले जाण्याची शक्यता शुन्य असते कारण व्यवसायिक फोटोग्राफर मार्केटमधे काम करण्यासाठी आलेला असतो आणि याच व्यवसायावर त्यांचे कुटुंब चालत असते म्हणुन ग्राहकांनी योग्य व्यवसायिकांकडे काम द्यावे
iv). नेहमीच प्रवासात असणा-या फोटोग्राफी व्यवसायिकांना मोफत किंवा माफक दरांमधे जिवन विमा देण्यात यावा
v). असहाय फोटोग्राफी व्यवसायिकांची फसवणूक होवू नये यासाठी जे ग्राहक फोटोग्राफरचे मोठया प्रमाणात पैसे बुडवतात अशा ग्राहकांचे एक पोर्टल तयार करण्याचे प्रयत्न करावे आणि सिबील स्कोर मधे याचा परिणाम दिसावा
vi). फोटोग्राफी व्यवससायिकांना ऑर्डरला जाणे–येणे, कामाचा अतिरिक्त ताण, वेळी-अवेळी प्रवास यासाठी शासनाने प्रत्येक तालुक्यात कमीत कमी 5 खोल्यांचे एक फोटोग्राफर भवन बांधण्याची सोय करावी जे भवन अडचणीच्या वेळी फोटोग्राफरच नव्हे तर त्यांच्या परिवाराच्या सुध्दा कामात येईल।
vii). फोटोग्राफी व्यवसायिकांच्या आत्मविश्वास वाढीसाठी कार्यशाळांचे आयोजन करावे
viii). समाजातली लोक, उच्चभ्रु लोकांनी फोटोग्राफी व्यवसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करावे

### संदर्भसूची


1. आगलावे प्रदीप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे
2. रा.ना. घाटोळे, समाज शास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती
3. कॉलिंग द शॉट्स, लिंडा कॅस्टन, हॅना कॅल्युज्नीक
4. www.google.com
5. वर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासिके :-
6. लोकमत
7. टाईम्स आॅफ इंडीया
8. क्लासिक ईमेजिंग
9. बेटर फोटोग्राफी
10. स्मार्ट फोटोग्राफी
11. द फोटोग्राफीक टाईम